# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

**<u>प्रेसनोट</u>** दिनांक १८/०३/२०२३

**" महाराष्ट्रभरात गाईंना इंजेक्शन देऊन त्यांना बेशुध्द करुन त्यांची कत्तल करुन घेवून जाणारे संघटीत गुन्हेगारी टोळी जेरबंद करुन त्यांचेवर मोका कायदयान्वये कारवाई केलेबाबत.. "**

**पिंपरी चिंचवड आयुक्तालय, पुणे शहर पोलीस आयुक्तालय तसेच पुणे ग्रामिण व रायगड पोलीस अधिक्षक यांचे कार्यक्षेत्रामध्ये रात्रीचे वेळी गाईंना गुंगीकारक इंजेक्शन देऊन त्यांना बेशुध्द करुन त्यांची कत्तल करुन घेवून जाणारे टोळीतील ९ आरोपींना दिघी पोलीस ठाणे तपास पथकाकडून अटक करण्यात आली आहे व त्यांचेकडून एकूण २५,२०,९८०/- रुपये किं.चा मुदेमाल हस्तगत करुन एकुण १४ गुन्हे उघड केले आहेत.**

पिंपरी चिंचवड आयुक्तालय, पुणे शहर पोलीस आयुक्तालय तसेच पुणे ग्रामिण व रायगड पोलीस अधिक्षक यांचे कार्यक्षेत्रामध्ये रात्रीचे वेळी गाईंना निर्जनस्थळी व माळराणावर चोरुन घेवून जाऊन त्यांना गुंगीकारक इंजेक्शन देऊन बेशुध्द करुन त्यांची कत्तल करुन त्यांचे मास घेवून जाण्याच्या घटना वारंवार घडत होत्या. सदरचे आरोपी २ ते ३ तासामध्ये हा सर्व प्रकार करुन फरार होत असत त्यामुळे सदर गुन्हयांचा तपास अतिशय कौशल्याने करणे गरजेचे होते.

त्याअनुषंगाने दिघी पोलीस ठाणे गु.र.नं. ४८४/२०२२ भा.द.वि. कलम ३८०, ४२९, ३४ सह प्राणी संरक्षण अधि. सुधारणा सन २०१६ चे कलम ५,५(अ),५(ब),६,९ सह भारतीलय हत्यार कायदा कलम ४(२५), महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(अ) १३५ मधील पाहिजे आरोपी यांचा दिघी पोलीस ठाणेचे पोउनि भदाणे व त्यांचे पथकाने सतत दोन महीने मुंबई, ठाणे, पुणे येथे सापळा रचुन तसेच तांत्रिक विश्लेषन व कौशल्यपुर्ण तपास करुन आरोपी नामे १) मोशीन बाबू कुरेशी २) शाहिद रहेमान कुरेशी ३) मोह. अब्दुल रहमान कुरेशी ४) आशराफ सलमान कुरेशी ५) मोह. आरिफ सलमान कुरेशी ६) सोहेल फारुक कुरेशी ७) राहुल पंडीत उर्फ राहुल भैया उर्फ राहील महंमद कुरेशी ८) मोशीन शरिफ कुरेशी ९) जाफर सुजीतकुमार सुभाषचंद्र पानीगृही अशा एकूण ९ आरोपींना ताब्यात घेतले आले असून नमुद आरोपी यांच्याकडून तीन वाहने (एन्जॉय, इनोव्हा, ऍक्सिव्ही महिंद्रा) तसेच गुन्हयात वापरलेले कायेते, सत्तुर, नायलॉन च्या दोऱ्या, इंजेक्शन औषधाची बाटली, नंबर प्लेट असा एकूण २५,२०,९८०/-रु किं.चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपी यांचेकडून १४ गुन्हे उघड करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे नमुद आरोपी यांचा खुनाचा प्रयत्न, दंगल तसेच गाईच्या चोरी, तस्करी अशा इतर प्रकारचे २९ गुन्हयात सहभाग असल्याचे निदर्शनात आले आहे. त्याअनुषंगाने सदर गुन्हयास महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी कायदयाचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

सदरचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी मा. पोलीस आयुक्त, श्री. विनय कुमार चौबे, मा. पोलीस सह आयुक्त, श्री. मनोज लोहिया, मा. अपर पोलीस आयुक्त, श्री. संजय शिंदे, मा. पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-१ श्री. विवेक पाटील, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, चाकण विभाग श्रीमती. प्रेरणा कट्टे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. दिलीप शिंदे, दिघी पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली दिघी पोलीस ठाणे तपास पथकातील पोलीस उप निरीक्षक सुनील भदाने, पोहवा ७३१/ फलके, पोहवा ८०१/ पोटे, पोहवा १०२० कांबळे, पोहवा ११६८ जाधव, पोना १५७१ विधाते, पोना १५७२ जाधव, पोना १६६५ नवगिरे, पोशि २०१२ दहिफळे, पोशि २०९४ जाधव, पोशि २५५८ शिंदे तसेच मपोना १६२० भाग्यश्री जमदाडे यांनी केली आहे.